1) पुढारी पान क्र. ३

दि. 29/01/2023

# मुलाच्या डोक्यावर शस्त्र रोखून धाडसी दरोडा

## वसईच्या खैरपाडा येथे थरार; मारहाणीत ३ जखमी, एकाला पकडण्यात यश

**खानिवडे : पुढारी वृत्तसेवा**

वसई तालुक्यातील पूर्व भागात असलेल्या तिल्हेर गावाच्या खैरपाडा येथिल रहिवाशी गणेश पदु मेगाळ ५४ यांच्या घरावर धाडसी दरोडा पडल्याची घटना घडली आहे. मुलाच्या डोक्यावर शस्त्र रोखून दरोडेखोरांनी तिघांना मारहाण केली. दरोडेखोरांनी कपाटाच्या चाव्या जबरदस्तीने मिळवत रोख रक्कम आणि दागिने घेवून फरार झाले आहेत.



तिल्हेर गावाच्या खैरपाडा येथे २७ जानेवारीच्या मध्यरात्रीनंतर हा दरोडा टाकताना दरोडेखोरानी घराचे दार वाजवून प्रवेश मिळवून प्रथम घरातील सदस्यांना मारहाण करून कपाटाच्या चाव्या मागितल्या.पण तरीही चावी देत नाहीत म्हणून घरातील झोपलेल्या स्वप्नील या लहान मुलाच्या डोक्यावर शस्त्र रोखून कपाटाच्या चाव्या जबरदस्तीने मिळवल्या. यावेळी त्यांनी घरमालक गणेश त्यांची पत्नी संगीता ४७ आणि ६० वर्षीय बहीण लक्ष्मी हिरवे यांना जबर मारहाण करत कपाटातील एक लाख तीस हजार रोख आणि मंगळसूत्र असा ऐवज घेऊन पोबारा करण्याचा प्रयत्न केला. मात्र दरोड्याच्या वेळी झालेल्या अक्रोशीत गलक्याने जागे झालेले गावातील नागरिक प्रसंगावधान ठेवून पडलेल्या दरोड्याच्या घराभोवती दबा धरून बसले होते. त्यांनी हिंमतीने दरोडेखोर पळून जात असताना एका दरोडेखोराला पकडण्यात यश मिळवले. मात्र दोघे दरोडेखोर अंधाराचा फायदा घेऊन पसार झाले.ही खबर लागलीच गावकऱ्यांनी मांडवी पोलिसांना दिली. मांडवी पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेऊन पकडलेल्या दरोडेखोराला ताब्यात घेऊन जखमींवर उपचार सुरु केले. या प्रकरणी पुढील तपास सुरू आहे.

> “ खैरपाडा येथे दरोडा टाकून लूटमार करत घरांतील कुटुंबाला जखमी करून फरार होणाऱ्या तीन आरोपींपैकी एकाला पकडण्यात आले असून फरार आरोपींचा शोध सुरू आहे. लवकरच त्यांना जेरबंद करण्यात येईल.
>
> **- प्रफुल्ल वाघ**
> वरिष्ठ पोलीस निरीक्षक मांडवी पोलीस ठाणे.

2) पुढारी पान क्र. 8

# कचरागाड्यांतील सांडपाणी रस्त्यावर

## बाईक घसरण्याचे अपघात, कारवाईची मागणी

**भाईंदर : पुढारी वृत्तसेवा**

मिरा-भाईंदर शहरांतून जमा होणारा कचरा वाहून नेणाऱ्या कॉम्पॅक्टर्रमधील चिकट सांडपाणी रस्त्यावर पडत असल्याने त्यावरून बाईक घसरून अपघात होण्याचे प्रमाण वाढत आहे. याप्रकरणी काँग्रेसच्या उत्तनमधील शिष्टमंडळाने उत्तन सागरी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ निरीक्षक करांडे यांना निवेदन दिले. त्यात रस्त्यावर कचऱ्याचे पाणी सांडणाऱ्या कॉम्पॅक्टर अथवा कचऱ्याच्या गाडीवर कारवाई करण्याची मागणी शिष्टमंडळाकडून करण्यात आली.



पालिकेने शहरातील कचरा उत्तनच्या धावगी-डोंगर येथील घनकचरा प्रकल्पामध्ये वाहून नेण्यासाठी कंत्राटावर कॉम्पॅक्टर्सची सोय केली आहे. यातील बहुतांशी कॉम्पॅक्टर्स मुदतबाह्य झाले असले तरी ते चालविण्यात येत आहेत. त्यामुळे या मुदतबाह्य ठरलेल्या कॉम्पॅक्टर्समध्ये भरण्यात येणाऱ्या ओल्या कचऱ्यातील चिकट सांडपाणी थेट वाहतुकीच्या रस्त्यावर पडते. यामुळे त्यावरून जाणाऱ्या बाईक अथवा स्कूटर अचानक थांबल्यास त्या घसरून अपघातग्रस्त होतात. असे कॉम्पॅक्टर्स तत्काळ कचरा वाहून नेण्यापासून रोखावे तसेच त्यांचा वाहतूक परवाना तपासून आवश्यकतेनुसार त्यांची दुरुस्ती करावी, जेणेकरून रस्त्यावर कचऱ्यातील चिकट सांडपाणी पडणार नाही. परिणामी, बाईक घसरून अपघात होणार नाहीत. यासाठी काँग्रेसच्या उत्तन शिष्टमंडळाने उत्तन सागरी पोलीस ठाण्याच्या वरिष्ठ पोलीस निरीक्षकांची भेट घेऊन त्यांना निवेदन दिले.

मिरा-भाईंदर महापालिका हद्दीत ठिकठिकाणी कचरा उचलणाऱ्या घंटागाड्यांमधील कचरा रस्त्यावर सांडतो. या कचऱ्यामुळे दुचाकीस्वारांची घसरगुंडी झाल्याचे प्रकार घडत आहेत. या अपघातांमध्ये दुचाकीस्वार गंभीररित्या जखमी झाल्याच्या घटना घडल्या आहेत.

CamScanner

दि. 29/01/2023

3) पुढारी पान क्र. 3

## रिवर्ड पॉईंटच्या नावाखाली फसवणूक झालेले १.३९ लाख परत मिळविले

**मिरारोड :** भाईंदर येथे राहणाऱ्या नागरिकाला तुमच्या क्रेडिट कार्डमध्ये रिवर्ड पॉईंट देण्याच्या नावाखाली क्रेडिट कार्ड मधून १,७६,१७० रुपये फसवणूक झाली होती. त्यातील सायबर गुन्हे प्रकटीकरण शाखेच्या पथकाने फसवणूक झालेले १ लाख ३९ हजार ४७९ रुपये परत मिळवून दिले आहेत. भाईंदर पोलीस ठाणे हद्दीत राहणारे सुनील सिंग यांना त्यांचे मोबाईलवर फोन आला की, तुमचे क्रेडीट कार्डचे रिवर्ड पॉइंटची माहिति अपडेट करीत आहोत असे सांगून त्यांच्या क्रेडीट कार्डवरून १,७६,१७० रुपये रक्कम काढून घेण्यात आली. त्याबाबत सिंग यांनी सायबर गुन्हे शाखेला तक्रार दिली होती. या तक्रारीबाबत सायबर गुन्हे शाखेचे अधिकारी व अंमलदार यांनी तात्काळ दखल घेवून तक्रारदार यांचे झालेल्या व्यवहाराबाबत माहिती घेतली. मिळालेल्या माहितीच्या अनुषंगाने सिंग यांची फसवणूक क्रोमा, रिलायंस डिजीटल अशा वेगवेगळ्या पेमेंट गेटवेद्वारे पूढे वळती करण्यात आली असल्याचे निदर्शनास आले. या पेमेंट गेटवे कंपन्यासोबत पत्रव्यवहार व पाठपूरावा करून त्यापैकी क्रोमा पेमेंट गेटवेद्वारे फसवणूक झालेली रक्कम गोठवण्यात आली व फसवणूक झालेली १ लाख ३९ हजार ४७९ रुपयांची रक्कम पुन्हा सिंग यांच्या मुळ खात्यावर परत मिळवून देण्यात आली आहे..

4) पुढारी पान क्र. 7

## घरफोडी करणाऱ्या ३ आरोपींना अटक

**मिरारोड :** तुळींज पोलीस ठाणे हद्दीत घरफोडी व चोरी करणाऱ्या तीन आरोपींना अटक करून त्यांच्या ताब्यातून ५ लाख ४३ हजारांचा मुद्देमाल तुळींज पोलीस ठाणे गुन्हे प्रकटीकरण पथकाने जप्त केला आहे.

मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयातील तुळींज पोलीस ठाणे हद्दी त घरफोडी चोरीच्या प्रमाणात वाढ झाल्यामुळे वरिष्ठांनी आरोपीचा शोध घेण्याच्या सूचना दिल्या होत्या. त्या सूचनांच्या अनुषंगाने तुळींज पोलीस ठाण्याचे गुन्हे प्रकटीकरण शाखेत कार्यरत असलेले अधिकारी व अंमलदार यांनी वेगवेगळ्या ठिकाणी तपास करून अरोपी देवेंद्र गणेश शेट्टी, शेखर नटराज नायर यास ताब्यात घेऊन विचारपूस केली असता त्यांनी तुळींज पोलीस ठाण्याच्या हद्दीत गुन्हा केल्याची कबुली दिली. त्या दोघांना या गुन्ह्यात अटक करून त्यांनी घरफोडी केलेले सोन्याचे दागिने, चांदी व इतर वस्तू असा ३ लाख ८८ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. या आरोपीविरुद्ध ठाणे शहर आयुक्तालय हद्दीत ६, मंबई हद्दीत ४ व तुळींज पोलीस ठाण्यात १.असे ११ गुन्हे दाखल आहेत. तसेच तुळींज पोलीस ठाण्यात दाखल असलेले मोबाईल जप्त केले.

5) पुढारी पान क्र. 8

## मांडवी पोलिसांचे ग्रामसुरक्षा दल

**वसई :** बेकायदा कृत्यांना आळा घालून गुन्हेगारी रोखण्यासाठी तसेच बंदोबस्तासाठी मदत मिळावी, यासाठी मांडवी पोलिसांनी आता ग्रामसुरक्षा दलाची स्थापना केली आहे. याअंतर्गत गावातील १०० तरुणांना टीशर्ट, काठ्या, शिटी आणि ओळखपत्र प्रदान करण्यात आले आहे. पोलिसांच्या कामात सक्रिय मदत करण्यासाठी राबविण्यात आलेला अशाप्रकारचा हा पहिलाच प्रयोग आहे. मागील वर्षी विरार पोलीस ठाण्याचे विभाजन करून मांडवी पोलीस ठाण्याची निर्मिती करण्यात आली. मांडवी पोलीस स्टेशन हद्दीत ३२ गावे असून अनेक लहान पाडे आहे. या पोलीस ठाण्याच्या हद्दीत १५ किलोमीटरचा राष्ट्रीय आणि १२ किलोमीटर लांबीचा राज्य महामार्ग आहे. त्यामुळे पोलिसांना सर्वच ठिकाणी लक्ष ठेवून बंदोबस्त ठेवता येत नव्हता. त्यामुळे या परिसरात बेकायदा गैरप्रकार वाढले होते.

6) सकाळ पान क्र. 5

## वसईत टेरेसवरून पडून तरुणाचा मृत्यू

नालासोपारा (बातमीदार) : वसईत एका २२ वर्षीय तरुणाचा टेरेसवरून पडून मृत्यू झाला. आज (ता. २८) ही घटना घडली आहे. वसईच्या विशालनगर परिसरात येथील रॉयल शाळेच्या आवारातील इमारतीमध्ये भुवन कनोजिया (वय २२) हा राहत होता. त्याला डोक्यावरील केसांची समस्या होती. डॉक्टरांनी त्याला एक औषध दिले होते, ते डोक्याला लावून केस उन्हात सुकवण्यास सांगितले होते. भुवन नेहमी ते औषध लावून इमारतीच्या टेरेसवर केस सुकवत होता. आजही संध्याकाळी साडेचार वाजण्याच्या सुमारास त्याने औषध लावून, केस सुकवण्यासाठी टेरेसच्या कठड्यावर बसला होता. अचानक त्याचा तोल जाऊन तो खाली पडून तो मयत झाला. त्याचा मृतदेह शवविच्छेदनासाठी रुग्णालयात पाठवण्यात आला आहे. भुवनचे वडील रॉयल शाळेत बसचालक म्हणून नोकरी करतात.

7) लोकमत पान क्र. 6

## पोहताना वृद्धाचा मृत्यू

**लोकमत न्यूज नेटवर्क**

**नालासोपारा :** वाडीतील विहिरीत पोहताना साठ वर्षीय वृद्धाचा बुडून मृत्यू झाल्याची घटना समोर आली आहे. गासगाव येथे राहणारे ॲन्थोनी फिगेर हे गुरुवारी सकाळी घराजवळील पाटील कुटुंबाच्या वाडीतील विहिरीत अंघोळीसाठी गेले होते. त्यानंतर ते बराच वेळ झाला तरी घरी परत न आल्याने विहिरीतील पाण्यात बुडून मृत्यू झाल्याचा संशय आल्याने चार तास विहिरीतील पाणी उपसल्यानंतर त्यांचा मृतदेह संध्याकाळी पाचच्या सुमारास आढळून आला. शुक्रवारी नालासोपारा पोलिसांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे.

CS CamScanner

8) लोकमत पू. पान क्र. 4


दि. 29/01/2023

# पोलिस शिपाई होण्याकरिता बी.टेक., एम.ईचे उमेदवार

लोकमत न्यूज नेटवर्क

**मीरा रोड :** मीरा-भाईंदर-वसई विरार पोलिस आयुक्तालयात सुरू असलेल्या पोलिस शिपाई व वाहन चालक पदाच्या भरतीसाठी चक्क बी.टेक., एम.ई. , बी.ई., एम.बी.ए., बी.बी.ए., बी.फार्म., बी.कॉम., एम. कॉम., एम.एस.सी., बी.एस.सी., एल.एल.बी. केलेल्या अति उच्चशिक्षित पदवीधारकांनी सहभाग घेतला आहे.

आयुक्तालयाच्या ११६ पोलिस शिपाई व वाहन चालक पदांच्या पोलिस भरती प्रक्रियेला सुरुवात झाली असून ७३ हजार २२१ अर्ज आले आहेत. त्यात मुलांचे ६० हजार ९८९ तर मुलींचे १२ हजार २३२ अर्ज पोलिस शिपाई या पदाकरिता आले आहेत. पोलिसांच्या १० वाहन चालक पदाकरिता एक हजार १९६ मुलांचे तर ४१ मुलींचे असे १ हजार २३७ अर्ज आले आहेत. भाईंदरच्या नेताजी सुभाषचंद्र बोस मैदानात शारीरिक तपासणी, फिटनेसच्या परीक्षा घेतल्या जात आहेत. पोलिस शिपाई व वाहनच चालक म्हणून नोकरी मिळवण्यासाठी आलेल्या अर्जात अतिउच्चशिक्षित व उच्चशिक्षितांची संख्या मोठी आहे.




9) लोकमत पान क्र. 5

# वसईत ट्रकखाली येऊन वृद्धेचा मृत्यू

लोकमत न्यूज नेटवर्क

**नालासोपारा :** वसईच्या दिवाणमान सर्कल येथे शनिवारी सकाळी ११ वाजण्याच्या सुमारास राज्य सरकारच्या धान्य वितरणाच्या ट्रकखाली येऊन ७५ वर्षीय वृद्ध महिलेचा मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. घटनास्थळी माणिकपूर पोलिस पोहोचून पंचनामा केला आणि मृतदेह ताब्यात घेऊन शवविच्छेदनासाठी पाठवला. अपघाताबाबत अधिक तपास सुरू आहे.

वसई पश्चिमेच्या परिसरात दिवाणमान परिसर आहे. याच परिसरात राहणाऱ्या पार्वती नारायण (७५) या शनिवारी सकाळी मंदिरात जाण्यासाठी घराबाहेर पडल्या. सर्कलजवळ पुरवठा विभागाच्या अन्नधान्य वितरण करणारे वाहन निघाले होते.

या ठिकाणी गाडी वळण घेत असताना सर्कलजवळ उभी असलेली वृद्ध महिला गाडीच्या चाकाखाली सापडून तिचा मृत्यू झाला. मागील तीन दिवसांत वसई-विरार शहरातील ट्रक अपघाताची ही दुसरी घटना आहे.

CamScanner

१०) लोकमत पु. पान क्र. १

दि. 29/01/2023

# नशेसाठी करायचा भरदिवसा घरफोडी

## तीन महिन्यांत विरारमध्ये १४ घरफोड्या

लोकमत न्यूज नेटवर्क

**मीरा रोड :** विरार परिसरात दिवसाच्या घरफोड्या करून धुमाकूळ घालणाऱ्या अट्टल घरफोड्यास पोलिसांच्या गुन्हे शाखेने बेड्या ठोकल्या आहेत. ऑक्टोबरमध्ये तीन वर्षांनी तुरुंगातून सुटल्यानंतर या नशेखोर घरफोड्याने तीन महिन्यांत तब्बल १४ घरफोड्या विरार भागात केल्या. अक्रम फारूक अन्सारी (२४) असे आरोपीचे नाव आहे. मीरा-भाईंदर-वसई विरार पोलिस आयुक्तालयाच्या गुन्हे शाखेचे उपायुक्त अविनाश अंबुरे यांनी शनिवारी मीरा रोड येथे पत्रकार परिषद घेऊन ही माहिती दिली.

२१ जानेवारीला विरारच्या फुलपाडा, विकासनगरी येथील श्री साई गणेश इमारतीत राहणाऱ्या रुक्मिणी गोवेकर व प्रवीण पांगम यांच्या घरात भरदिवसा चोरी झाली होती. या गुन्ह्याचा तपास गुन्हे शाखेकडे दिला होता. गुन्हे शाखेने तांत्रिक विश्लेषण, सीसीटीव्ही पडताळणी करून २३ जानेवारीला अक्रम याला अटक केली.

### वसई-विरार भागात १० गुन्हे

अक्रम याला अमली पदार्थाचे व्यसन आहे. लग्न होऊनही कामधंदा न करता व्यसनाच्या आहारी गेलेल्या अक्रम याने घरफोड्यांचा सपाटा लावला. त्याच्यावर विरार-वसई भागात घरफोड्यांचे १० गुन्हे दाखल आहेत. रखवालदार व सीसीटीव्ही हेरून तो टाळे लावलेल्या घरावर पाळत ठेवत असे. अक्रम सध्या विरार पोलिसांच्या कोठडीत आहे.

११) लोकमत पु. पान क्र. ४

# चोरीच्या गुन्ह्यांतील दीड लाखांचा मुद्देमाल परत

लोकमत न्यूज नेटवर्क

**मीरा रोड :** मीरा- भाईंदरमधील सहा पोलिस ठाण्यांच्या हद्दीत गेल्यावर्षी व चालू महिन्यात चोरीच्या ५१ गुन्ह्यांतील चोरीचा तब्बल एक कोटी सात लाखांचा मुद्देमाल मूळ मालकांना पोलिसांनी परत मिळवून दिला.

मीरा- भाईंदर- वसई- विरार पोलिस आयुक्तालयातील परिमंडळ एकमध्ये मीरा- भाईंदरची काशिमीरा, मीरा रोड, नवघर, नयानगर, भाईंदर व उत्तन अशी सहा पोलिस ठाणी येतात. २०२२ सालात तसेच सध्या सुरू असलेल्या जानेवारी महिन्यात चोरी वा घरफोडीच्या घडलेल्या गुन्ह्यांपैकी ५१ गुन्ह्यांचा तपास करण्यात पोलिसांना यश आले.

चोरीला गेलेला ऐवज मिळेलच याची सामान्य नागरिकांना शाश्वती नसते; परंतु, पोलिसांनी केलेल्या कौशल्यपूर्ण तपासामुळे ५१ गुन्ह्यांतील एक कोटी सात लाख ५२ हजारांचा मुद्देमाल पोलिसांना हस्तगत करता आला.

पोलिस आयुक्त मधुकर पांडे यांच्या हस्ते चोरीला गेलेला मुद्देमाल संबंधित नागरिकांना मीरा रोड येथील एका कार्यक्रमात परत करण्यात आला. परिमंडळ एकचे पोलिस उपायुक्त जयंत बजबळे, सहायक आयुक्त विलास सानप, शांतीलाल जाधव व शशिकांत भोसले, पोलिस अधिकारी अमलदार व नागरिक उपस्थित होते.



पोलिसांनी तपास करून मिळविलेल्या तीन चारचाकी, दोन ऑटो रिक्षा, आठ दुचाकी, १५ मोबाईल, सोन्याचे दागिने, रोख रक्कम व इतर मूल्यवान वस्तू नागरिकांना परत करण्यात आल्या.

CamScanner

दि. 29/01/2023

12) लोकमत पान क्र. 5

# पोलिस असल्याचे सांगून खंडणी उकळणारे गजाआड

लोकमत न्यूज नेटवर्क

**मीरा रोड :** पोलिस असल्याचे धमकावून ४० हजार रुपयांची खंडणी उकळणाऱ्या दोघा भामट्यांना भाईंदर पूर्व भागातून नवघर पोलिसांनी अटक केली.

दीपक हॉस्पिटल लगतच्या मार्गावर श्री राज एन्क्लेव्ह या इमारतीतल्या एका घरात पोलिस असल्याचे सांगत दोघे जण घुसले. त्यावेळी घरात राहणारी तरुणी भाविका, तिची आई तुलसी पुरोहित व परिचित यांच्याकडे चौकशी करू लागले.

तुम्ही घरात वेश्या व्यवसाय चालवत आहात, खाली पोलिसांची गाडी उभी असून त्यात महिला पोलिस असल्याचे सांगत त्यांना गुन्हा दाखल करण्याची व सोसायटीमध्ये बदनामी करण्याची धमकी देत पाच लाखांची मागणी दोघांनी केली.



पोलिस असल्याने घाबरून तरुणीने तिचे दागिने सराफाकडे गहाण ठेवून ४० हजार रुपये दिले. त्या दरम्यान तिने बहिणीला कॉल करून पोलिस ठाण्यात कळवण्यास सांगितले.

नवघर पोलिसांनी पुरोहित यांच्या घरी जाऊन तेथे असलेल्या एका तोतया पोलिसाला अटक केली तर, पैसे घेऊन भाविकासोबत परत आलेल्या तोतयास सुद्धा पोलिसांनी पकडले. सुदर्शन खंदारे व जितेंद्र पटेल अशी अटक केलेल्या खंडणीखोर तोतया पोलिसांची नावे आहेत.

13) पुण्यनगरी पू. पान क्र. 1

# फसवणूक करणाऱ्या आरोपीस अटक

**मीरा रोड :** नवघर पोलीस ठाणे हद्दीत एका व्यक्तीने फर्निचर बनवण्याचे काम देतो, असे सांगून एका व्यक्तीची ३१ हजार रुपयांची फसवणूक केली होती. फसवणूक करणाऱ्या आरोपीस नवघर पोलिसांनी अटक केली आहे. अर्जुन रामलखन विश्वकर्मा यांना २१ जानेवारी रोजी अरविंद गुप्ता याने मोबाईलवरून संपर्क करून मीरा रोड येथील हॉटेलच्या फर्निचरचे काम देतो, असे सांगितले. त्यानुसार विश्वकर्मा हे अरविंद गुप्ता यांना भेटले असता त्याने त्यांची ओळख संतोष पांडे यांच्याशी करून दिली. त्या वेळी हॉटेलमध्ये १५० बेडचे व कपाटांचे काम असल्याचे सांगून त्यांच्याकडून ॲग्रीमेंट करावे लागेल, असे कारण सांगून प्रथम ११,३०० रु. घेतले तसेच काम मिळवण्यासाठी ५०,००० रु. खर्च येईल, असे सांगून दुसऱ्या वेळेस २०,००० रु. संतोष पांडे याने घेऊन त्यांना फर्निचर बनवण्याचे काम न देता व त्यांनी दिलेले पैसे परत न करता त्यांची फसवणूक केली. त्यामुळे विश्वकर्मा यांनी पोलीस ठाण्यात दिलेल्या तक्रारीवरून आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला होता. आरोपी संतोषकुमार ऊर्फ पन्नालाल बुधीराम पांडे यास वसई येथून अटक केली.

CamScanner

# Two fake cops held for extortion

SURESH GOLANI
MIRA-BHAYANDAR

The presence of mind shown by a 23-year-old woman on Thursday evening led to the arrest of two men who impersonated cops and tried to extort money from her family in Bhayandar. The family was also threatened with implications in a false case of running a prostitution racket.

According to the police, the duo Sudarshan Khandare and Jitendra Patel identified themselves as cops from the local police station and barged into the complainant's flat. The duo threatened the family with arrest for operating a prostitution racket and defaming them in the housing society, police said. They also demanded Rs5 lakh from the family.

Expressing the inability to arrange such a huge amount, the complainant agreed to provide her mother's gold ornaments. However, the complainant managed to inform her younger sister about the matter. The complainant's sister informed the police who reached the flat and arrested Khandare.

Unaware of the development, Jitendra Patel landed at the building in an auto-rickshaw with the money only to be welcomed by real policemen.

Apart from other sections in the IPC, the duo has been arrested for impersonating a public servant, extortion, cheating and criminal conspiracy.

CS CamScanner

# लिंकवर क्लिक करताच लाखो रुपये साफ



## वेळेत तक्रार दिल्याने ११ लाख १४ हजार परत

मंगेश कराळे
लोकमत न्यूज नेटवर्क

नालासोपारा : मीरा-भाईंदर, वसई-विरार पोलिस आयुक्तालयांतर्गत सायबरविषयक तक्रारींची चौकशी व सायबर गुन्ह्यांच्या तपासाकरिता गुन्हे शाखेंतर्गत सायबर गुन्हे कक्ष कार्यरत आहे. या विभागाने २०२२ या वर्षात उल्लेखनीय कामगिरी करत २,७३८ प्रकरणात फसवणूक झालेले ११ लाख १४ हजार ८३३ रुपये पीडितांना परत केले आहे.

अनेकदा तुमच्या घरी ऑनलाइन पार्सल येत आहे. आता तुमच्या मोबाइलवर ओटीपी येईल, बँकेत केवायसी नाही, आधार नंबर सांगा, ओटीपी सांगा, मोबाइल नंबर सांगा, एटीएम कार्ड ब्लॉक झाले आहे, तुम्हाला लकी ड्रॉमध्ये गिफ्ट लागले आहे, असे एकना अनेक बहाण्यांनी फोन करून गोपनीय माहिती मागण्याचे प्रकार भामट्यांकडून सुरू आहेत. या अशा जाळ्यात कित्येकजण सहज अडकतात. अगदी अशिक्षितच नाही, तर उच्चशिक्षितही फसवणुकीचे बळी ठरतात. अनेकांना तर थेट लाखो रुपयांची लॉटरी लागली आहेत, असे संदेश पाठवले आहेत, तर काहींना फोन कॉलही येत आहेत. सोबतच प्ले स्टोरमधून एनीडेस्क, क्विक सपोर्ट आणि टीम व्यूअरसारखे ॲप्स डाउनलोड केल्यावर फसवणूक होत आहे. यात त्यांनी दिलेल्या लिंकवर क्लिक करण्यास सांगितले जाते आणि तुम्ही ते केल्यास तुमच्या बँक अकाउंट एक क्षणात रिकामे होते, अशा घटना घडलेल्या आहेत. त्यामुळे असे मेसेज, फोन कॉलपासून सावध राहण्याचा सल्ला पोलिस देतात किंवा फसवणूक झालीच तरी पोलिसांत तक्रार द्यावी.



### ऑनलाइन फसवणूक झाल्यास कोठे तक्रार कराल?

सायबर फसवणुकीचा प्रकार आपल्यासोबत घडल्यास तत्काळ नजीकच्या पोलिस ठाण्यात. सायबर गुन्हे कक्षास संपर्क साधावा. तसेच १९३० या हेल्पलाइनवर तक्रार देण्याचे नागरिकांना आव्हान करण्यात आले आहे.

### २७ गुन्हे उघड

सन २०२२ मध्ये एकूण २७ प्रकरणांमध्ये आरोपी शोधून त्यांना ताब्यात घेऊन पोलिस ठाणे येथे नोंद असलेले सायबर फसवणुकीचे गुन्हे उघडकीस आणले आहेत.

### २,७३८ जणांची वर्षभरात फसवणूक

मीरा-भाईंदर, वसई-विरार पोलिस आयुक्तालयाच्या अंतर्गत सायबर गुन्हेगार नागरिकांची ऑनलाइन फसवणूक करण्यासाठी दिवसेंदिवस नवनवीन युक्त्या शोधून काढतात. वर्षभरात २७३८ जणांची अशाप्रकारे फसवणूक केली आहे.

### सायबर पोलिसांची उत्तम कामगिरी



विरारमध्ये राहणाऱ्या महिलेच्या डीमॅट खात्यावरून १ लाख १४ हजार ४७१ रुपयांचे शेअर्स कमी होऊन फसवणूक झाल्याची तक्रार सायबर गुन्हे कक्षाला ६ मेला करण्यात आली होती.

सायबर विभागाने तत्काळ नोडल अधिकाऱ्यांशी संपर्क साधून तो व्यवहार थांबविण्यासाठी पत्रव्यवहार केला. तसेच शेअर्स परत मिळवण्यासाठी वारंवार ई-मेलद्वारे संपर्क साधून पाठपुरावा केला.

त्या कंपनीने तत्काळ ट्रान्झेक्शन रद्द करून फसवणूक केलेले १ लाख १४ हजार ४७१ रुपयांचे शेअर्स तक्रारदार महिलेच्या खात्यावर जमा केलेले आहे.




२०२२ मध्ये २,७३८ तक्रार अर्ज सायबर विभागात प्राप्त झाले होते. यातील ११ लाख १४ हजार ८३३ रुपये पीडितांना परत केले आहे.

ऑनलाइन लो[...] ॲप डाउनलोड करण्यापूर्वी त्याच्या सत्यतेची पडताळणी करावी. कोणताही अनोळखी कॉल आल्यास क्रेडिट कार्ड/बँकेशी संबंधित माहिती देऊ नये अथवा ओटीपी शेअर करू नये. क्रेडिट कार्डद्वारे व्यवहार करताना त्याची माहिती कोठेही सेव्ह करू नये.

- सायबर अधिका[...]



CS CamScanner

# Recently out of jail, junkie arrested for serial thefts

SURESH GOLANI
MIRA BHAYANDAR

A notorious burglar, who was recently released from prison, was again arrested by the crime branch unit (Zone III) attached to the Mira Bhayandar-Vasai Virar (MBVV) police for his alleged involvement in a spate of daylight house break-in cases in the twin-city.

According to the police, the accused, identified as Akram Farookh Ansari (24), was previously involved in over a dozen theft cases for which he was caught and sent to judicial custody.

After his release in October 2022, Akram again started committing crimes. Alarmed by the sudden rise in cases of daylight burglaries, the crime branch team led by Police Inspector Pramod Badhaak under the guidance of DCP (crime) Avinash Ambure was roped in to conduct parallel investigations into the case.

During the investigations, the team analysed footage captured by CCTV cameras of the crime scene and getaway route of the bike-borne thief which led to his identification. The team activated their informer network and based on a tip-off arrested him from Palghar district.

epaper.freepressjournal.in

**Prima facie probe has revealed his involvement in 14 unsolved cases of theft**



"Prima facie investigations have revealed his involvement in 14 unsolved cases of thefts which were committed in Virar within a span of two months. The accused committed the crimes to fund his habit of consuming drugs," said Badhaak.

Apart from the bike used in the crimes, the police recovered stolen booty including mobile phones, gold and silver ornaments, collectively worth more than Rs 2.89 lakh, from the possession of the accused who has been booked under sections 380 and 454 of the IPC. Further investigations were on.

THE FREE PRESS JOURNAL

CamScanner

# घरफोडी करणारे त्रिकूट अटकेत

## ५ लाख ४३ हजारांचा मुद्देमाल केला हस्तगत

लोकमत न्यूज नेटवर्क

**नालासोपारा :** तुळिंज परिसरात घरफोडी, चोरी करणाऱ्या सराईत त्रिकूटाला तुळींज गुन्हे प्रकटीकरण पथकातील पोलिसांनी अटक करून दोन गुन्ह्यांची उकल करीत ५ लाख ४३ हजारांचा मुद्देमाल त्यांच्याकडून हस्तगत केला आहे.

तुळिंज पोलिस ठाण्याच्या हद्दीत घरफोडी, चोरीच्या घटनांत वाढ झाल्याने त्याची वरिष्ठांनी गांभीर्याने दखल घेऊन आरोपींचा शोध घेण्याबाबत सूचना दिल्या होत्या. त्या अनुषंगाने तुळिंज पोलिस ठाण्याच्या गुन्हे प्रकटीकरण शाखेत कार्यरत असलेले अधिकारी व अंमलदार यांनी तांत्रिक विश्लेषण व गुप्त बातमीदार यांच्याकडून मिळालेल्या माहितीचे आधारे आरोपी देवेंद्र गणेश शेट्टी आणि शेखर नटराज नायर या दोघांना ताब्यात घेऊन चौकशी केली. त्यांनी दाखल असलेल्या गुन्ह्यात सहभागी असल्याचे कबूल केल्याने त्यांना अटक केली. या गुन्ह्यातील घरफोडीत चोरलेले ११ तोळे वजनाचे सोन्याचे दागिने, २० तोळे चांदीचा कमरबंद, एल.जी. कंपनीचा ६५ इंच कलर टीव्ही असा एकूण ३ लाख ८८ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल हस्तगत केला आहे. दोन्ही आरोपींविरोधात ठाणे शहर आयुक्तालय कार्यक्षेत्रात ६, मुंबई शहर आयुक्तालय कार्यक्षेत्रात ४ व मीरा भाईंदर, वसई विरार आयुक्तालय कार्यक्षेत्रात १ असे गुन्हे दाखल आहेत.

तसेच तुळिंज पोलिस ठाण्यात १६ जानेवारीला दाखल असलेल्या गुन्ह्यातील संशयित आरोपी प्रशांत सिंग याला ताब्यात घेतले. त्यानेही गुन्हा केल्याचे कबूल केल्याने त्याला अटक केली. त्याच्या ताब्यातून गुन्ह्यात चोरीला गेलेली मोबाइल डिव्हाईस मशीन व मोबाइल असा १ लाख ५५ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल हस्तगत केला आहे.



तुळींज गुन्हे प्रकटीकरण पथकाने तीन सराईत चोरट्यांना अटक करून त्यांच्याकडून सुमारे साडेपाच लाखोंचा मुद्देमाल हस्तगत केला आहे.

### तुळींज गुन्हे प्रकटीकरण पथकाची कामगिरी

ही कामगिरी पोलिस उपायुक्त सुहास बावचे, सहायक पोलिस आयुक्त रामचंद्र देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली तुळिंज पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक शैलेंद्र नगरकर, सहायक पोलिस निरीक्षक मिथुन म्हात्रे, पोलिस उपनिरीक्षक बाळासाहेब बांदल, गीते, सहायक पोलिस उपनिरीक्षक शिवानंद सुतनासे, पोलिस हवालदार आनंद मोरे, उमेश वरठा, जमादार, पांडुरंग केंद्रे, छपरीबन, राऊत यांनी केली आहे.



CS CamScanner

मुंबई चौफेर

# वाहन चोरीचे साडेतीनशेहून अधिक गुन्हे उघडकीस

भाईंदर - मीरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तलयाच्या हद्दीत २०२२ या पूर्ण वर्षभरात मोठ्या प्रमाणात वाहन चोरीच्या घटना घडल्याचे समोर आले आहे. यात दुचाकी व चारचाकी वाहनांचा समावेश आहे. गेल्या वर्षात वाहन चोरीचे तब्बल ८४४ गुन्हे दाखल झाले आहेत. त्यापैकी ३८३ गुन्हे उघड झाले आहेत, तर २०२१ या वर्षात एकूण ८६९ गुन्हे दाखल असून, ३१९ गुन्हे उघडकीस आले आहेत. २०२१ व २०२२ या दोन्ही वर्षातील दाखल व उघड गुन्ह्यांची आकडेवारी पाहता २०२२ या वर्षात पोलिसांनी वाहन चोरीचे जास्त गुन्हे उघडकीस आणल्याचे दिसत आहे. उर्वरित गुन्हे उघडकीस आणण्यासाठी पोलीस प्रयत्न करत असून, लवकरच वाहन चोरीचे सर्व गुन्हे उघडकीस येतील, असे आयुक्तलयाच्या मार्फत सांगण्यात आले आहे.

मीरा-भाईंदर शहरात अनेक इमारतीत वाहनतळाची सोय नसल्यामुळे नाइलाजाने वाहनधारकांना आपली वाहने रस्त्यावरच उभी करावी लागत आहेत. मात्र रस्त्यावर वाहन उभी केल्यानंतर ती चोरीला जाण्याचे प्रमाण गेल्या काही दिवसांत वाढले आहे. त्यामुळे शहरात वाहन चोरीच्या तक्रारी नागरिकांकडून करण्यात येत आहेत. मीरा-भाईंदर, वसई-विरार आयुक्तलयाच्या हद्दीमधील काशिमीरा, नयानगर, माणिकपूर, वालीव, पेल्हार या पोलीस ठाण्यांमध्ये वाहन चोरीचे गुन्हे उघडकीस आणण्याचे प्रमाण अधिक असून, दाखल गुन्ह्यांची संख्यादेखील अधिक आहे. नवघर, मिरारोड, उत्तन, भाईंदर, वसई, नालासोपारा, अर्नाळा, मांडवी, आचोळे, तुलिंज या पोलीस ठाण्यांमध्ये दाखल उघड गुन्ह्यांचे प्रमाण कमी आहे.वालीव पोलीस ठाण्याच्या हद्दीत सर्वात अधिक वाहन चोरीचे गुन्हे दाखल आहेत. एक कॅमेरा शहरासाठी या पोलिसांच्या संकल्पेतून शहरात जास्तीत जास्त कॅमेरे बसवण्यात आल्याने वाहन चोरीचे गुन्हे उघडकीस आणण्यात पोलिसांना मोठ्या प्रमाणात मदत होत आहे. मीरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयाची स्थापना झाल्यानंतर शहरातील गुन्हेगारीचे प्रमाण कमी करण्याकरिता पोलीस प्रशासने पालिका प्रशासनाच्या मदतीने चौकचौकात सीसीटीव्ही कॅमेऱ्यांची उभारणी केली आहे. याच शिवाय पोलीस दलातील मनुष्यबळ वाढवून दिवस-रात्र पोलीस बंदोबस्त देखील वाढवण्यात आला आहे, तरी देखील गेल्या वर्ष भरात तब्बल ८४४ वाहनांची चोरी झाली असून, केवळ ३८३ वाहन चोरीचे गुन्ह्यांचा उलघडा करण्यात पोलिसांना यश मिळाले आहे.

CamScanner